## वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ **भिवंडी :** मुंबई-नाशिक महामार्गावर अज्ञात भरधाव वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने पुन्हा एकदा भीषण अपघात झाला.या अपघातात मुलाच्या समोरच पित्याचा मृत्यू झाला.यानंतर फरार झालेल्या चालकावर गुन्हा दाखल करून पोलिसांनी घटनेची नोंद करून त्याचा शोध सुरू केला आहे. मुंबईतील जोगेश्वरी परिसरात राहणारे मॅथ्यू डिसूझा (६७) हे त्यांचा मुलगा ऑस्टिन डिसोझा (२६) याच्यासह दुचाकीवरून मुंबई - नाशिक महामार्गावरून ठाण्याच्या दिशेने जात होते.

## अत्याचाराच्या निषेधार्थ निदर्शने

■ **ठाणे :** पश्चिम बंगाल राज्यातील संदेशखरी भागातील महिलांवर अत्याचार करणारया नराधमांना फाशी द्या , महिलांवरील अत्याचार थांबलेच पाहिजेत , केंद्र सरकारने पश्चिम बंगाल मधील सरकार ताबडतोब बरखास्त करा या प्रमुख मागणीसह शुक्रवारी ठाण्यातील कोर्ट नाका परिसरात तेजस्विनी महिला संस्थेच्या महिलांनी जोरदार निदर्शने केली. या गावामध्ये तृणमूल काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी महिलांवर २०११ पासून वारंवार अत्याचार केले.

## शेअर मार्केटिंगच्या नावावर फसवणूक

■ **मुंब्रा :** कळवा येथील पारसिकनगर येथे राहणाऱ्या व्यक्तीला फेसबुकवर शेअर मार्केटिंगच्या नावावर पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. नोव्हेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत घनश्याम क्षिरसागर यांना अनोळखी फेसबुकधारक व्यक्तीने फेसबुकवर शेअर मार्केटिंग करता जाहिरात पाठवली व व्हॉटसअॅप ग्रुप जॉईन करण्यास सांगितला. त्यानंतर ग्रुपवर लिंक पाठवून त्यामध्ये मेगथर्म इंडक्शन कंपनीचे आयपीओ खरेदी करण्याकरता क्षिरसागर यांना ४ लाख ९३ हजार ७९५ रुपये ऑनलाईन पाठविण्यास सांगितले. मात्र ते पैसे परत न करता त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे.

## बोईसर-चिल्हार रस्त्याच्या दुरुस्तीला अखेर सुरुवात

■ **बोईसर:** चिल्हार रस्त्याच्या दुरुस्तीचे काम एमआयडीसीचे उपअभियंता मुकेश लांजेवार यांनी सुरु केले असून विविध संघटना व नागरिकांच्या मागणीला यश आल्याने प्रवाशांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या रस्त्यावरील नागझरी नाका येथील रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली होती.सध्या या रस्त्यावर तात्पुरती डागडुजी करण्यात येत आहे.तसेच लवकरच अपूर्णावस्थेत असलेले कामही सुरू करण्याचे प्रस्ताव संबधित विभागाच्या कार्यालयात पाठवण्यात आले आहेत. या स्त्याची तत्काळ दुरुस्ती व्हावी,अशी मागणी विविध संघटनांनी उपअभियंता लांजेवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती.

# चोरलेल्या रिक्षाचा वापर करून घरफोडी करणारे त्रिकुट जेरबंद

### घरफोडी व चोरीचे सात गुन्हे उघड

■ **नवी मुंबई :** चोरीच्या रिक्षाचा वापर करून रात्रीच्या वेळेस दुकानांचे शटर तोडून रोख रक्कम चोरणाऱ्या त्रिकुटाला वाशी पोलिसांनी अटक केली आहे. विशाल प्रकाश जाधव, सुरज बंडू तिकडे व अल्लाउद्दीन रफिक सय्यद अशी या त्रिकुटाची नावे आहेत. या त्रिकुटाने नवी मुंबई व ठाणे परिसरात अशा पद्धतीने केलेले सात घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांकडून या गुन्ह्यातील एक रिक्षा व काही मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या कारवाईत अटक करण्यात आलेले त्रिकुट ठाण्यातील इंदिरा नगर परिसरात राहण्यास असून, या तिघांनी काही दिवसांपूर्वी ठाण्यातून चोरलेल्या रिक्षातून वाशीत येऊन या भागात घरफोडी केली होती. या प्रकरणाचा वाशी पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. या तपासात आरोपी ज्या रिक्षामधून चोरी करण्यासाठी आले होते, त्या रिक्षाचा नंबर वाशी पोलिसांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये मिळाला होता. त्यानुसार पोलिसांनी रिक्षाचा माग काढला असता, सदर



रिक्षा ठाण्यात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली असता, या त्रिकुटाने सदरची रिक्षा चोरुन नेल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन नांद्रे, हेड कॉन्स्टेबल चिकणे, वारिंगे, पोलीस नाईक ठाकूर, पोलीस कॉन्स्टेबल डगळे, पोलीस शिपाई ठाकूर आदींच्या पथकाने या त्रिकुटांची गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाद्वारे माहिती काढून तिघांना ठाण्यातील इंदिरा नगर परिसरातून अटक केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी केली असता, त्यांनी वाशी, सानपाडा, रबाळे, नौपाडा, वर्तकनगर व वागळे इस्टेट या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घरफोडी, चोरीचे ७ गुन्हे केल्याचे उघडकीस आले. त्यानुसार वाशी पोलिसांनी या त्रिकुटाला अटक केली आहे. तसेच त्यांनी चोरी करण्यासाठी वापरलेली एक रिक्षा व एक मोबाईल फोन हस्तगत केले आहे. या त्रिकुटाविरोधात यापूर्वी एन.आर.आय पोलीस ठाणे, वर्तकनगर, वागळे इस्टेट पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत.

**चोरलेल्या रिक्षातून येऊन करत होते घरफोडी**

या प्रकरणात अटक करण्यात आलेले तिघे चोरटे रात्रीच्या सुमारास ठाणे परिसरातून रिक्षाची चोरी करत होते, त्यानंतर ते नवी मुंबई व ठाणे परिसरात फिरत असत. त्यानंतर संधी साधून हे त्रिकुट एखाद्या बंद दुकानांचे शटर तोडून त्यात असलेली रोख रक्कम चोरी करून पळून जात होते. त्यानंतर ज्या परिसरातून रिक्षा चोरली, त्याच भागात दुसरीकडे रिक्षा लावून हे चोरटे पसार होत असल्याचे तपासात आढळून आले.

# द्रुतगती मार्गाने घेतला मोकळा श्वास!

### कांदिवलीतील झोपड्यांवर हातोडा

■ **मुंबई :** कांदिवली आर दक्षिण विभागाने दुसऱ्यांदा तोडक कारवाई करत अनधिकृत बस्तान मांडलेल्या नागरिकांमध्ये वचक बसवला आहे. कांदिवली पूर्वेला द्रुतगती मार्गावरील उभारण्यात आलेल्या जवळपास ७० झोपड्या भूईसपाट करून तोडक कारवाईतील सामान जप्त केले आहे. यामुळे स्थानिक नागरिक तसेच प्रवाशांसह वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कांदिवली पूर्वेला द्रुतगती मार्गाच्या बाजूला दत्तानी पार्क, साईधाम मंदिर परिसरात काही अज्ञात समाजातील नागरिकांनी घरे बांधून बस्तान मांडले होते. यामुळे हा परिसरात घाण, दुर्गंधी आणि बकाल अवस्थेमुळे स्थानिक नागरिक, प्रवाशी आणि वाहनचालकांना नाहक त्रास



सहन करावा लागत होता. परिमंडळ ७ च्या उपायुक्त डॉ. भाग्यश्री कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त ललित तळेकर आणि कार्यकारी अभियंता डी. एम. राठोड यांनी धडक कारवाई केली. या कारवाईत पालिकेचे सहाय्यक अभियंता, ४ अभियंता आणि ६ कनिष्ठ अभियंता तसेच ४० कर्मचारी कार्यरत होते. ३ जेसीबी आणि ५ डंपर आदींचा वापर करण्यात आला. तोडक कारवाईला विरोध करण्यासाठी तेथील नागरिकांनी काचेच्या बाटल्या फोडल्या तसेच काहींनी स्वतःच्या अंगावर ब्लेडने वार केले, मात्र १० महिला पोलीस, ४० पोलीस, ३ पोलीस निरीक्षक यांनी चोख बंदोबस्त दिल्याने कारवाई सायंकाळी ५ वाजेपर्यंत पूर्ण करण्यात आली. परिसर आणि द्रुतगती मार्ग मोकळा झाल्याने नागरिकांसह वाहनचालकांनी पालिकेचे आभार व्यक्त केले.

# पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकणारा पती गजाआड



### भाजलेल्या विवाहितेची प्रकृती चिंताजनक

■ **नवी मुंबई :** झोपेत असलेल्या पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकून फरार झालेल्या पतीला पनवेल तालुका पोलिसांनी पनवेल रेल्वे स्थानकातून अटक केली. रमजान सिद्दिकी गाझी (२८) असे या पतीचे नाव असून, गत २० जानेवारी रोजी पहाटे त्याने पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकून पलायन केले होते. या ॲसिड हल्ल्यात गंभीररीत्या भाजलेली विवाहिता सध्या पश्चिम बंगाल येथील रुग्णालयात उपचार घेत असून तिची प्रकृती चिंताजनक आहे.

पतीच्या ॲसिड हल्ल्यात जखमी झालेली अमिना खातून ऊर्फ अमिन बिबी रमजान गाझी (२८) ही मूळची पश्चिम बंगालमधील आहे. अमिना खातून ही पती रमजान गाझी याच्यासह मोलमजुरी करून पनवेल तालुक्यातील वावंजे येथील खैरणे गावात रिझवान कंपनीजवळ राहत होती. रमजान गाझी याची बहीण हैदराबाद येथे राहण्यास असून, या बहिणीकडे राहण्यास जाण्यासाठी रमजानने पत्नी अमिना खातून हिच्या पाठीमागे गेल्या काही दिवसांपासून तगादा लावला होता. मात्र, अमिना खातून हिने हैदराबाद येथे त्याच्या बहिणीकडे जाण्यास स्पष्ट नकार दिला होता. गेल्या १९ जानेवारी रोजी रात्रीदेखील या पती-पत्नीमध्ये याच गोष्टीवर भांडण झाले होते.

त्यामुळे रमजान याने या गोष्टीचा राग मनामध्ये धरून २० जानेवारी रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास अमिना खातून ही गाढ झोपेमध्ये असताना रमजानने तिच्या चेहऱ्यावर घातक ॲसिड टाकून पलायन केले होते. यात अमिना खातूनचा चेहरा व शरीर गंभीररीत्या भाजल्याने तीने शेजाऱ्यांच्या मदतीने पनवेलमधील खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचार घेऊन पश्चिम बंगाल येथील माहेर गाठले. त्यानंतर तिने आपल्या कुटुंबीयांच्या मदतीने कोलकाता येथील हॉस्पिटलमध्ये उपचार घेऊन तेथील बनियापुकूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर कोलकाता पोलिसांनी झीरो नंबरवरून दाखल केलेला गुन्हा पनवेल तालुका पोलिसांकडे पुढील तपासासाठी वर्ग केला होता.

त्यानंतर पनवेल तालुका पोलिसांनी फरार झालेल्या रमजान गाझी याच्या विरोधात कलम ३२६ (अ) नुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला होता. या तपासात पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोलीस हवालदार सतीश तांडेल, पोलीस शिपाई राजू सोनकांबळे, भीमराव खताळ व त्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाद्वारे आरोपीचा शोध घेऊन त्याला गुरुवारी रात्री पनवेल रेल्वे स्थानक आवारातून अटक केली. न्यायालयाने त्याची २६ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी ठोठावल्याची माहिती वपोनि. अनिल पाटील यांनी दिली.

## लाचप्रकरणी पश्चिम रेल्वेच्या मुख्य कार्यालय अधीक्षकाला बेड्या

■ **मुंबई :** पश्चिम रेल्वेला साहित्य पुरवठा करणाऱ्या खासगी कंपनीची ४ कोटी ८० लाखांची बिले मंजूर करून रक्कम मिळवून देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच घेणाऱ्या पश्चिम रेल्वेच्या मुख्य कार्यालय अधीक्षकाला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) अटक केली आहे. संजय वाघेला असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. तक्रारदारच्या कंपनीकडून पश्चिम रेल्वेला साहित्य पुरवठा करण्यात आला होता. कंपनीने पुरवलेल्या साहित्याची ४ कोटी ८० लाख रुपये किंमतीची तीन बिले पश्चिम रेल्वेच्या लेखा विभागाकडे सादर केली. पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल येथील डीआरएम कार्यालयातील लेखा विभागात प्रक्रिया अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या लाचखोर मुख्य कार्यालय अधीक्षक संजय वाघेलाने तक्रारदाराकडे बिले मंजूर करून रक्कम मिळवून देण्यासाठी एकूण बिलाच्या रकमेच्या प्रति लाख १०० रुपयांप्रमाणे ४ कोटी ८० लाख रुपयांच्या बिलांच्या रकमेसाठी ५० हजारांची मागणी केली. लाचेची मागणी होताच कंपनीतर्फे तक्रारदार यांनी सीबीआयकडे लेखी तक्रार दिली. सीबीआयच्या पडताळणीत वाघेला हा पैशांची मागणी करत असल्याचे स्पष्ट झाले. अखेर, सीबीआयच्या पथकाने सापळा रचून वाघेला याला लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ अटक केली आहे. वाघेला याच्या मुंबई येथील कार्यालयात आणि अन्य एका ठिकाणी अशी दोन ठिकाणी झडती घेत महत्त्वपूर्ण कागदपत्रे आणि जंगम मालमत्ता जप्त करण्यात आली.

## २५ हजारांची लाच स्वीकारणारे दोन सहाय्यक अभियंते एसीबीच्या जाळ्यात

■ **नवी मुंबई :** गावातील विकासकामाचे अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी २५ हजारांची लाच स्वीकारल्याप्रकरणी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी सायंकाळी उरण पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता रेश्मा ओंकार नाईक (३१) व रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता सतीश वसंत कांबळे (५१) या दोघांना अटक केली.

उरण तालुक्यातील गावातील विकासकामाचे अंदाजपत्रक मंजूर करण्याकरता उरण पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता रेश्मा ओंकार नाईक यांनी स्वतःसाठी व रागयड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता सतीश कांबळे यांच्यासाठी ३० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. त्यानुसार गत ८ फेब्रुवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पडताळणी करण्यात आल्यानंतर रेश्मा नाईक यांनी तडजोडीअंती २५ हजार रुपये स्वीकारण्याचे कबूल केल्याचे आढळून आले होते. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २१ फेब्रुवारी रोजी सापळा लावला होता.मात्र, रेश्मा नाईक यांनी लाचेची रक्कम रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता सतीश कांबळे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यामुळे



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी सायंकाळी अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग कार्यालयात सापळा लावला होता. या वेळी सहाय्यक अभियंता सतीश कांबळे यांनी तक्रारदाराकडून २५ हजार रुपयांची लाच स्वीकारल्यानंतर त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नवी मुंबई युनिटने रंगेहाथ पकडले. त्यानंतर या पथकाने उरण पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील सहाय्यक अभियंता रेश्मा ओंकार नाईक यांनादेखील ताब्यात घेतले. सदरची कारवाई नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक शिवराज म्हेत्रे व त्यांच्या पथकाने केली.

## लग्नाचे आमिष दाखवून शिक्षिकेला लाखोंना गंडा

■ **मुंबई :** शादी डॉट कॉम या वेबसाईटच्या माध्यमातून संपर्क साधत ओळख वाढवून एका ठगाने पायधुनीमधील शिक्षिकेला लग्नाचे आमिष दाखवून २१ लाख ७३ हजारांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. फसवणूक झालेल्या शिक्षिकेने दिलेल्या तक्रारीवरून, गुन्हा दाखल करून पायधुनी पोलीस अधिक तपास करत आहेत. पायधुनीतील बापू खोटे स्ट्रीट परिसरात राहात असलेल्या ४२ वर्षीय तक्रारदार या व्यवसायाने शिक्षिका आहेत. त्यांनी गेल्या वर्षी मे महिन्यात त्यांनी शादी डॉट कॉम या वेबसाईटवर आपले प्रोफाईल अपलोड केले होते. त्यांना हैदराबादमधील इम्रानअली खान नावाच्या व्यक्तीने संपर्क साधत तो बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कॉण्ट्रक्टर असल्याची बतावणी केली. इम्रानअली खान नावाच्या व्यक्तीने तक्रारदार शिक्षिकेला लग्नाचे आमिष दाखवून वेगवेगळी कारणे सांगून तिच्याकडून पैसे उकळण्यास सुरुवात केली. मुंबईतील भेंडीबाजार येथे एका लॉजमध्ये भेटण्यास बोलावून त्याने तक्रारदार शिक्षिकेकडे शरीरसुखाची मागणी केली. मात्र, तिने नकार दिला. डोंगरीतील गेस्ट हाऊसमध्ये वास्तव्यास राहून तो तक्रारदार यांना भेटत होता. त्याने भायखळा येथील प्लॉट खरेदी करायचा असल्याचे सांगून तक्रारदार शिक्षिकेकडून १५ लाख ३० हजार रुपये घेतले. पुढे, हैदराबादमध्ये भाडेतत्त्वावर घर घेण्याच्या बहाण्याने ३५ हजार रुपये आणि पोलिसांनी अटक केल्याचे सांगत आणखी पैसे उकळले. अशाप्रकारे त्याची पैशांची मागणी सुरूच होती.तक्रारदार शिक्षिकेने त्याला मे ते ऑक्टोबर २०२३ या काळात तब्बल २१ लाख ७३ हजार ५०२ रुपये दिले. त्याने ही रक्कम परत केली ना तक्रारदार यांच्याशी विवाह केला. आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने तक्रारदार शिक्षिकेने पायधुनी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

## मिथेनॉल विक्रीच्या बहाण्याने फसवणूक

■ **मुंबई :** बोरिवलीतील एका केमिकल व्यावसायिकाला ४२ कोटी रुपये किमतीचे मिथेनॉल विक्री करीत असल्याचे भासवून या व्यावसायिकाकडून ८ कोटी ४६ लाख रुपये घेत त्यांची फसवणूक करण्यात आली आहे. व्यावसायिकाने दिलेल्या तक्रारीवरून याप्रकरणी नंद छाब्रिया, नरेन ऊर्फ नरेंद्र सचनंदानी, इंद्रजित चौहान, अंकुर, अँड्रीन ऊर्फ हाजीर मोहम्मद सदेघ तोफीघी यांच्यासह 'रिगन्स इंटरनॅशनल डीएमसीसी' कंपनीविरोधात गुन्हा दाखल करून बोरिवली पोलीस तपास करत आहेत. बोरिवली पश्चिमेकडील एस.व्ही. रोड परिसरात राहात असलेल्या केमिकल व्यावसायिक सचिन मेहता यांची एक फार्मा कंपनी आहे. जुलै २०२३ मध्ये यातील आरोपी नंद छाब्रिया याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने 'रिगन्स इंटरनॅशनल डीएमसीसी' कंपनीच्या माध्यमातून मेहता यांना ४२ कोटी ३४ लाख २७ हजार ९९७ रुपये किमतीचे २० हजार मेट्रीक टन मिथेनॉल पुरवण्याचे आमिष दाखवले.विक्री करण्याचा व्यवहार



बनवून आरोपींनी या व्यवहारातील २० टक्के रक्कम आगाऊ आणि उर्वरित ८० टक्के रक्कम मालाच्या संपूर्ण डिलीव्हरीनंतर देण्याचे ठरवले. त्यानुसार, आरोपींनी मेहता यांच्याकडून ८ कोटी ४६ लाख ८५ हजार ५९९ रुपये घेतले. मात्र, त्यांना मिथेनॉल पुरवले नाही. आरोपींनी बनावट बिल ऑफ लॅडिंग पाठवून ही फसवणूक केली होती. अखेर मेहता यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार, बोरिवली पोलिसांनी मेहता यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरोधात भादंवि कलम ४०६, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## बांधकाम व्यावसायिक पिता-पुत्रावर फसवणुकीचा गुन्हा




■ **पालघर :** येथील जीवन विकास शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष आणि बांधकाम व्यावसायिक वागेश कदम व संस्थेचे खजिनदार व त्यांचे पुत्र प्रणव वागेश कदम यांच्याविरोधात न्यायालयाच्या आदेशाने पालघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा नोंदवताना पोलिसांनी असहकार्य केल्याने याप्रकरणी फिर्यादीने न्यायालयात धाव घेतली होती.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, वागेश कदम व त्यांचा मुलगा प्रणव कदम यांनी बांधकाम क्षेत्रात उतरण्याचे ठरवत केळवे येथील बांधकाम व्यावसायिक गणपत राऊत उर्फ गटम राऊत या बांधकाम व्यावसायिकांच्या सोबत भागीदारी व्यावसायिक म्हणून त्यांचा मुलगा धीरज गणपत राऊत यांच्यासह सतु रिअल्टी या बांधकाम क्षेत्रातील भागीदारी संस्थेची स्थापना २०१५ मध्ये केली होती. सतु रिअल्टीच्या माध्यमातून पालघर-बोईसर रस्त्यावर सतु ऑरा नावाचा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे. त्यातील एकूण ८० सदनिकांपैकी ५८ सदनिकांची विक्री करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीनुसार एकूण विक्री झालेल्या सदनिकांपैकी पाच सदनिकांची विक्री करताना वागेश कदम व प्रणव कदम यांनी आपसात संगनमत करून त्यांना कोणतेही अधिकार नसताना व दस्त नोंदणीसाठी धीरज राऊत यांच्या संमतीची व स्वाक्षरीची आवश्यकता असतानादेखील बेकायदा विक्री कराराचे दस्तऐवज तयार केले, भागीदारी पत्रानुसार दस्तऐवज अधिकृत नसताना ते अधिकृत आहेत असे दाखवून बनावट दस्तऐवज किंवा इलेक्ट्रॉनिक अभिलेख करण्यासाठी वापरत सुमारे १ कोटी ५७ लाख रुपयांची रक्कम भागीदारी संस्थेच्या नावाने उचलून गैरव्यवहार केला. ही रक्कम वागेश सदानंद कदम व प्रणव वागेश कदम यांनी परस्पर स्वतःच्या खात्यात वळती करून फायद्यासाठी वापरली, असे तक्रारदार राऊत यांचे म्हणणे आहे.हा प्रकार लक्षात आल्यानंतर राऊत यांनी पालघर पोलीस ठाणे व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार दिली होती. मात्र पोलिसांनी या प्रकरणात लक्ष न दिल्यामुळे त्यांनी पालघरच्या न्यायालयात याविरोधात धाव घेतली. त्यांनी दाखल केलेला दावा व उपलब्ध पुरावे या अनुषंगाने वागेश व प्रणव कदम यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्यानंतर पालघर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चार हजारांची लाच मागणे सहाय्यक लेखाधिकाऱ्याला भोवले

■ **मुंबई :** प्रशासकीय कार्यालयातील ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी ४ हजार रुपयांची लाच मागणारा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील लाचखोर सहाय्यक लेखाधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकला असून, मिलिंद पाखले असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, यातील तक्रारदार हे सरकारी कर्मचारी आहेत. त्यांनी २००३ मध्ये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडून १ लाख ८२ हजारांचे गृहकर्ज घेतले होते. त्यांनी या कर्जाची व्याजासह परतफेड केली. मात्र, त्यानंतरही त्यांच्या वेतनातून कर्जाचा हप्ता कपात झाला. तक्रारदार यांना संबंधित प्रशासकीय कार्यालयातील ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती. ना हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी



तक्रारदार हे गेल्या वर्षी ५ जुलैला सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई कार्यालयात गेले होते. येथे संबंधित डेस्कचे काम बघणाऱ्या सहाय्यक लेखाधिकारी मिलिंद पाखले यांनी ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी ७ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. लाचेची मागणी होताच तक्रारदार यांनी एसीबीकडे पाखले यांच्या विरोधात लेखी तक्रार दिली. त्यानुसार, एसीबीने केलेल्या पडताळणीत पाखले याने ५ हजार रुपयांची मागणी करून तडजोडी ४ हजार रुपयांची लाच मागितली. अखेर, एसीबीने या प्रकरणाचा तपास करत पाखलेविरोधात गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

## एकाच दिवसात दोन हजार मूषकांचा नायनाट!

### पालिकेच्या कीटकनाशक विभागाची मोहीम

■ **मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कीटकनाशक विभागाकडून मूषक विनाशक विशेष मोहिमेअंतर्गत दादर, माहिम आणि धारावी भागामध्ये २,०८० मूषकांचा नायनाट करण्यात आला. एकाच दिवशी इतक्या मोठ्या प्रमाणात उंदरांचा नायनाट करण्याचा हा आजवरच्या मोहिमेमधील उच्चांक असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

परिसर स्वच्छता आणि नागरिकांचे आरोग्य अबाधित राहावे, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून अविरतपणे विविध उपाययोजना केल्या जातात. सर्व प्रशासकीय विभागांमध्ये मूषक नियंत्रणाची कार्यवाही नियमितपणे सुरू असते. नागरिकांकडून केलेल्या तक्रारींनुसार, घरांमध्ये मूषक सापळे लावून अथवा घराबाहेरील परिसरात बिळांमध्ये नाशक गोळ्या टाकून मूषक नियंत्रणाची कार्यवाही नियमितपणे केली जाते. मूषकांचा उपद्रव असलेल्या परिसरात सर्वेक्षण घेऊन त्या ठिकाणी मूषक नियंत्रणाची विशेष मोहीम राबवली जाते. यानुसार कीटकनाशक विभागाच्या वतीने गुरुवारपासून 'जी उत्तर' विभागातील दादर, माहिम आणि धारावी परिसरात मूषक नियंत्रण विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या परिसरातील एकूण ९,०६५ बिळांमध्ये झिंक



फॉस्फाईड व सेलफॉस आणि ५५ किलो गव्हाच्या पिठाचे मिश्रण असलेल्या गोळ्या टाकण्यात आल्या. त्यानंतर दुसऱ्या दिवशी २,०८० मृत मूषक गोळा करण्यात आले. या परिसरामध्ये फेब्रुवारी २०२३ पासून आतापर्यंत अशाप्रकारच्या चार विशेष मोहीम राबवण्यात आल्या असून इतक्या मोठ्या प्रमाणात प्रथमच मूषकांचा नायनाट करण्यात आला आहे.

'जी उत्तर' विभागाचे कीटक नियंत्रण अधिकारी, १३ पर्यवेक्षकीय कर्मचारी आणि ४५ कामगारांच्या चमूने नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत ही कार्यवाही पूर्ण केल्याचे सांगण्यात आले.